# टीसीएस आयटी विझ २०१७ चे नागपूर एडिशन १२ सप्टेंबर रोजी

**नागपूर, २९ ऑगस्ट :** टाटा कंसलटन्सी सर्विसेस (टीसीएस)या आघाडीच्या आयटी सर्विसेस, कंसलटींग आणि बिजनेस सोल्युशन फर्म तर्फे टीसीएस आयटी विझ २०१७ च्या नागपूर एडिशनची घोषणा करण्यात आली असून १२ सप्टेंबर २०१७ रोजी सिव्हिल लाईन्स येथील डॉ वसंतराव् देशपांडे सभागृहात याचे आयोजन करण्यात येणार आहे. वर्ग ८ ते वर्ग १२ मधील विद्यार्थी यात सहभागी होऊ शकतात. एका शाळेतून दोन विद्यार्थी असलेल्या एकापेक्षा अधिक चमू देखील भाग घेऊ शकतात. यासाठी प्रवेश निःशुल्क ठेवण्यात आला आहे.

शाळांना आपल्या एन्ट्रीज ९ सप्टेंबर पर्यंत किंवा त्याआधी श्री प्रशांत कोपरकर, टीसीएस आयटी विझ समन्वयक, अग्रवाल हाऊस, बुराडे गल्ली, तेलीपुरा, सीताबर्डी, नागपूर येथे नोंदवायच्या आहेत. अधिक माहितीसाठी ९८२२१९३६५५ वर संपर्क साधावा.... वर ऑनलाईन नोंदणी देखील केली जाऊ शकते. या आयटी विझ मध्ये आयटी क्षेत्रासबंधी विविध व्यक्ती, घडामोडी, उपकरणं इत्यादी वर प्रश्न विचारले जातील. टीसीएस आयटी विझ २०१७ भारतातील १२ ठिकाणी आयोजीत केली जाणार आहे यात अहमदाबाद, बंगलोर, भुवनेश्वर, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, इंदोर, कोची, कोलकाता, मुंबई, नागपूर आणि पुणे या शहरांचा समावेश आहे. प्रादेशिक फेऱ्यांमधून पात्र झालेल्या चमूंमध्ये डिसेंबर मध्ये होऊ घातलेल्या राष्ट्रीय अंतिम फेरीत मुंबई येथे सामना होईल.